श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**पेढे व बर्फीचे दरपत्रक**

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषय:— पेढे व बर्फीचे दरपत्रक.

पुरवठा धारकाचे पूर्ण नाव :— श्री.—————————————————————

पूर्ण पत्ता :— —————————————————————

—————————————————————

मोबाईल कं.:— —————————————————————

महोदय,

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे नित्योपचार विभागासाठी दि.०१/०८/२०१८ ते दि. ३१/०१/२०१९ या कालावधीसाठी पेढे व बर्फी चा पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे दरपत्रक सादर करीत आहे.

| अ. क्र. | तपशील | ब्रँडचे नांव / दर्जा | परिमाण (किलो) | दर प्रती किलो रक्कम | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकी (रू.) | अक्षरी(रू.) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | केशरी पेढे | उत्तम | प्रती किलो | | | |
| २ | मलई बर्फी | उत्तम | प्रती किलो | | | |

वरील दर श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर येथे पोहोच खर्च आणि सर्व प्रकारचे करासहीत आकारण्यात आले आहेत. सदर दराने उक्त कालावधीत उत्तम गुणवत्तेचे पेढे व बर्फी चा पुरवठा करणेस मी बांधील राहील. त्याबाबतचे अटी व शर्ती मान्य असलेचे करारपत्र १०० रू. स्टॅपपेपरवर करून देण्यास मी तयार आहे. रू.५,०००/— अनामत रकमेचा डी.डी./पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे पेढे व बर्फी चा पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक / /२०१८ पुरवठाधारकाची सही व शिक्का

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत.

१. यापूर्वी कोणत्या संस्थेला पेढे व बर्फीचा पुरवठा केला असल्यास, त्याची अनुभवाची प्रमाणपत्रे सोबत जोडावीत.
२. स्वत:च्या ओळखपत्राची व रहिवासाच्या पूराव्याची झेरॉक्स प्रत.
३. अनामत रक्कमेचा डी.डी/ जमा पावतीची झेरॉक्स प्रत.
४. अन्न व भेसळ विभागाचे परवाण्याची प्रत.
५. पॅनकार्ड.
६. शॉप ॲक्ट लायसन्स.

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

पेढे व बर्फी पुरवठा कामाची माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

१. सदर कामासंबंधीचा फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून दि.१३/०८/२०१८ पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर पुरवठाधारकाचे पूर्ण नाव व पूर्ण पत्ता नमुद करणे आवश्यक आहे. तसेच लिफाप्यावर पेढे व बर्फी पुरवठा करणेकामी दरपत्रक असे नमुद करणे आवश्यक आहे. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठव्यात. उशीरा आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.५,०००/— डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठा धारकाने फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने दि.०१/०८/२०१८ ते दि.३१/०१/२०१९ या कालावधीत पेढे व बर्फीचा पुरवठा इकडील मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करावयाच्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | मालाचा प्रकार | गुणवत्ता | अंदाजे लागणारे पेढे व बर्फी प्रतिदिन |
|---|---|---|---|
| १ | केशरी पेढे | उत्तम | ४ ते ५ किलो |
| २ | मलई बर्फी | उत्तम | ४ ते ५ किलो |

५. अन्न व भेसळ विभागाची परवानगी असणे आवश्यक आहे.

६. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच मालाचा पुरवठा करणेचा आहे.

७. सर्व पेढे व बर्फी स्वच्छ व चांगल्या गुणवत्तेची असणे आवश्यक आहे.

८. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

९. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही

१०. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

११. मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण नित्योपचार विभाग आहे.

१२. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१३. दरपत्रकात नमुद सर्व साहित्यांचा दर नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१४. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१५. सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१६. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठाधारक जबाबदार राहील.

१७. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१८. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१९. सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२०. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर पुरवठा आदेश कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२१. प्रशासकीय व अन्य कारणास्तव पुरवठा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

———————''————————